# संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ

## राष्ट्रीय सेवा योजना

दुरध्वनी : ०७१२-२६६०९४७ Email : directornss@sgbau.ac.in


क्र.संगाबाअवि/१७/१५८/२०१७
दिनांक : १९.०८.२०१७

प्रति,
मा.प्राचार्य,
सर्व संलग्नित रासेयो महाविद्यालय,
संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ,
अमरावती

विषय :-विद्यापीठस्तरीय सत्रारंभ सभेला नियुक्त रासेयो कार्यक्रम अधिकारी पाठविण्याबाबत..

**महोदय,**

सत्र २०१७-१८ केंद्र व राज्यशासनाचे विविध उपकम योजना रासेयो विद्यार्थी व रासेयो कार्यक्रम प्रभावी व यशस्वीपणे राबवावयाच्या आहेत. विशेषतः वित्तीय साक्षरता अभियान, स्वच्छ भारत अभियान, मतदार जनजागृती, प्रभावी जलसंवर्धन, महिला सक्षमीकरण, संकटकालीन शेतकऱ्यांचे मनोबल वाढविण्यासंदर्भात जनजागृती, इत्यादी विषयाच्या अनुषंगाने मा.कुलगुरू डॉ.मुरलीधर चांदेकर यांच्या अध्यक्षतेखाली **गुरूवार दिनांक ३१ ऑगस्ट,२०१७ रोजी सकाळी ११.००** वाजता विद्यार्थी भवन, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती येथे विद्यापीठस्तरीय रासेयो कार्यक्रम अधिकारी सत्रारंभ सभेचे आयोजन करण्यात आले आहे.

सभेच्या अनुषंगाने सत्र २०१६-१७ मध्ये विद्यापीठस्तरीय उत्कृष्ट ठरलेल्या रासेयो एकक कार्यकम अधिकारी व स्वयंसेवक यांना व स्वच्छ भारत अभियानातंर्गत उत्कृष्ट ठरलेल्या एककांना मान्यवरांच्या हस्ते पुरस्कार देवुन सन्मानित करण्यात येणार आहे. सभेच्या अनुषंगाने रासेयो प्रमाणपत्र, डायऱ्या, व बॅचेस हे मंजुर विद्यार्थी संख्येनुसार प्रदान करण्यात येईल.

सदर सभेच्या प्रथम सत्रात मा. कुलगुरू तसेच निमंत्रित विषयतज्ञ मौलिक मागदर्शन करणार आहे. तसेच व्दितीय सत्रात प्रशासकीय व वित्तीय कार्यपध्दतीवर मार्गदर्शन करण्यात येईल. या पत्रासोबत महाविद्यालयाच्या ई-मेल वर प्राप्त होणाऱ्या प्रशासकीय वित्तीय माहितीपत्रकासह कार्यक्रम अधिकाऱ्यांना सदर सभेला उपस्थित राहणे अनिवार्य आहे.

सभेला येतांना कार्यकम अधिकारी माहितीपत्रक, नियमित व विशेष शिबिर अनुदान मागणीपत्र इत्यादीसह कार्यकम अधिकाऱ्यांना उपस्थित राहण्यास सुचित करावे, **दि.३१ ऑगस्ट,२०१७** रोजी सकाळी १०.३० वाजेपर्यंत सभेच्या स्थळी उपस्थित राहणे अनिवार्य आहे. भोजन व्यवस्था विद्यापीठाव्दारे करण्यात आलेली आहे. कृपया नोंद घ्यावी व संबंधितांना उपस्थित राहण्यास सुचित करावे, हि विनंती.

आपला,

सहपत्र : वरिलप्रमाणे

**(डॉ.अविनाश असनारे)**
प्र.संचालक,
राष्ट्रीय सेवा योजना
संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ

**टिप** :- महाविद्यालयाला ई-मेल व्दारा प्राप्त माहिती पुस्तिकेतील निर्देशित प्रारूपामध्ये असलेल्या , नियमित व विशेष शिबिर अनुदान मागणीपत्र, कार्यक्रम अधिकारी माहितीपत्रक सादर करावयाचे आहे. तसेच १) मतदार जनजागृती अभियान माहिती अहवाल,२) वृक्षारोपण अहवाल, ३) स्वच्छ भारत अभियान पंधरवाडा अहवाल.

प्रतिलिपी :
मा.कुलगुरु कार्यालय, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती